क्र.२/नसवि/महासभा/ ०२ /२०१९-२०२०
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०९ सप्टेंबर २०१९

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०२ /२०१९-२०२०

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मधील तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक १९/०९/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१४/०३/२०१९ रोजीच्या व विशेष महासभा दि.२०/०७/२०१९ रोजीची तहकूब सभा दि.२४/०७/२०१९ आणि दि.०४/०९/२०१९ रोजीच्या सभांचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१४ मधील (गणपती पेठेची मागील बाजू) जत गुडस् ऑफिस समोरील चौकास पै.बाबूमास्तर घोरपडे चौक असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२५/०६/२०१९ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिका क्षेत्रातील अमरधाम स्मशान भूमीत नव्याने होणाऱ्या गॅसदाहीनीचे इमारतीस कै.रामभाऊ खाडिलकर असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०१/०८/२०१९ चे विषयपत्र.**

६. महानगरपालिका क्षेत्रातील समतानगर येथील रस्ता क्र.८ व ९ चौकास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१६/०७/२०१९ चे विषयपत्र.**

... २ ...

७. मा.महासभा ठराव क्र.१३० दि.१९/०१/२०१८ नुसार महानगपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२ मधील जुना धामणी रोड सांगली या रस्त्यास / मार्गास पद्मभूषण कै.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम मार्ग असे नामकरण करणेस सुचना /हरकती मागविणेत आल्या होत्या. तथापि, भारतरत्न कै.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम मार्ग असे नामकरण करणेस अंतीम मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२३/०७/२०१९ चे विषयपत्र.**

८. राष्ट्रीय नदीकृती योजनेंतर्गत सांगली येथील कृष्णा नदीचे प्रदुषण रोखणे,सांडपाणी अडविणे व वळविणे या कामी उभारणेत आलेली योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून महापालिकेकडे हस्तांतरीत करुन घेणेस धोरणात्मक निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (जलनि:सारण विभाग,सांगली) यांचे दि.०२/०८/२०१९ चे विषयपत्र.**

९. महानगरपालिका क्षेत्रामध्ये राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानातर्गत नविन इमारत बांधकाम व साहित्याकरीता सन २०१४-१५ मधील कृती आराखड्यामध्ये रु.५ कोटी मात्रचे एक अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर (UCHC) महानगरपालिकेच्या जागेवर इमारतीचे बांधकाम करणेसाठी जागा निश्चिती करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेकरीता **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०१/०८/२०१९ चे विषयपत्र.**

१०. महानगरपालिका क्षेत्रामध्ये महिलांसाठी सर्वाधिक गर्दीच्या चार ठिकाणी पिंक टॉयलेट सुरु करणेसाठी महापालिका क्षेत्रातील चार ठिकाणे निश्चित करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०१/०८/२०१८ चे विषयपत्र.**

११. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील सि.स.नं.२३,२५ व ३० या मनपा मालकीच्या जागेतील फिश /मटण मार्केट इमारतीची पुन:बांधणी करणे करीता महापालिका वास्तुविशारद पॅनल वरील वास्तुविशारद श्री.आशिष चिंचवाडे,सांगली यांचेकडून प्राप्त झालेला र.रु.४,७४,५०,२६३/- मात्रचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या राष्ट्रीय मत्स्य विकास महामंडळाकडे निधी मंजुरीसाठी पाठविणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०१/०८/२०१९ चे विषयपत्र.**

१२. IMA वर्किंग कमिटी व सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने आमराई उद्यानातील फुलपाखरु उद्यान विकासीत करणे व उद्यानाची दैनंदिन देखभाल व्यवस्था ठेवणेस निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (बांधकाम (उद्याने) विभाग) यांचे दि.०१/०८/२०१९ चे विषयपत्र.**

१३. सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका आणि आकार फाऊंडेशन,सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरपालिका शाळा क्र.६ मधील ३ वर्ग खोल्यांमध्ये मानसिक आजार आधार केंद्र चालविणेस धोरणात्मक निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (दिव्यांग कक्ष) यांचे दि.३१/०७/२०१९ चे विषयपत्र.**

१४. रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी टेक्सटाईल सिटी यांनी मिरज हायस्कूल, मिरजचे नुतनीकरण करणेसाठी र.रु.८०.०० लक्ष मात्रचे कामी नुतनीकरण करणेकरीता परवानगी देणे व समजुतीचा लेख (MOU) चा मसुदा मान्य करुन, त्यांच्याशी समजुतीचा लेख करणेसाठी धोरणात्मक निर्णयास्तव **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.३१/०७/२०१९ चे विषयपत्र.**

१५. स्ट्रीट लाईटींग नॅशनल प्लॅन (SLNP) अंतर्गत इस्को (ESCO) मोडमध्ये एनर्जी एफिशिअन्सी सर्व्हिसेस लि.(EESL) यांचेमार्फत महानगरपालिका स्थलसिमेमध्ये एलईडी प्रकल्प राबविणेस निर्णयार्थ **उपायुक्त (बांधकाम (विद्युत)विभाग) यांचे दि.०६/०६/२०१९ चे विषयपत्र.**

१६. घनकचरा व्यवस्थापनासाठी सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) ला महासभेच्या मंजूरीने शासनास पाठविणेस, तांत्रिक मान्यतेस येणारे खर्चास मंजुरी, भविष्यात वेळोवेळी काही (DPR) मध्ये बदल करणेचे आदेशीत केलेले अधिकार महापालिका आयुक्तसो यांना प्रदान करणेस मंजुरी मिळणेबाबत **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०७/०९/२०१९ चे विषयपत्र.**

१७. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

१८. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ९४

विषय क्रमांक :- ८

सोबतचे उपायुक्त (जलनि:स्सारण विभाग) यांचे दि.१६/०७/२०१९ रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

राष्ट्रीय नदीकृती योजनेंतर्गत सांगली येथील कृष्णा नदीचे प्रदुषण रोखणे,सांडपाणी अडविणे व वळविणे या कामी उभारणेत आलेली योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून महापालिकेकडे हस्तांतरीत करुन घेणेस धोरणात्मक निर्णयार्थ आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाने योजना पूर्ण करणेस येणाऱ्या खर्चास नविन DPR तयार करुन ८ ते १० दिवसात मा. शासनाकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (गणेश मार्ने) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (लक्ष्मण नवलाई) महापौर,

कार्यकारी अभियंता (जलनि:स्सारण विभाग)

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ४६

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.१४/०६/२०१९ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.०१ ते ठराव क्र.४३ हे विशेष महासभा दि.२०/०७/२०१९ रोजीची तहकूब सभा दि.२४/०७/२०१९ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.४४ आणि विशेष महासभा दि.०४/०९/२०१९ रोजीच्या कार्यवृतातील ठराव क्र.४४ व ४५ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ९०

विषय क्रमांक :- ४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२५/०६/२०१९ रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.१४ मधील (गणपती पेठेची मागील बाजू) जत गुडस् ऑफिस समोरील चौकास पै.बाबूमास्तर घोरपडे चौक असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार व विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (गणेश मार्ने) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (दक्षता नवलाई) महापौर,

कालकत्ता विभाग

~~[illegible]~~

पू महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ९१

विषय क्रमांक :- ५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०१/०८/२०१९ रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील अमरधाम स्मशान भूमीत नव्याने होणाऱ्या गॅसदाहीनीचे इमारतीस कै.रामभाऊ खाडिलकर असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार व विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- (गणेश माळी) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (तुकाराम पाटील) महापौर,

मालमत्ता विभाग
~~प्रशासकीय अधिकारी~~

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ९२

विषय क्रमांक :- ६

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१६/०७/२०१९ रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील समतानगर येथील रस्ता क्र.८ व ९ चौकास पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक असे नामकरण करणेस अंतिम मान्यता देणेकामी सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार व विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- (अपेक्षा मार्ग) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (लक्ष्मण नवलाई) महापौर,

मालमत्ता विभाग

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ९३

विषय क्रमांक :- ७

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१६/०७/२०१९ रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.महासभा ठराव क्र.१३० दि.१९/०१/२०१८ नुसार महानगपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.२ मधील जुना धामणी रोड सांगली या रस्त्यास / मार्गास पद्मभूषण कै.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम मार्ग असे नामकरण करणेस सुचना /हरकती मागविणेत आल्या होत्या. तथापि, भारतरत्न कै.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम मार्ग असे नामकरण करणेस अंतीम मान्यता मिळणेकामी सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार व विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :- (गणेश मार्ने) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (लक्ष्मण नवलाई) महापौर,

मालमत्ता विभाग

प्र. महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ९५

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०१/०८/२०१९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये महानगरपालिकेच्या जागेवर राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियांनातर्गत नविन इमारत बांधकाम व साहित्याकरीता सन २०१४-१५ मधील कृती आराखड्यामध्ये रु.५ कोटी मात्रचे एक अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर (UCHC) महानगरपालिकेच्या जागेवर इमारतीचे बांधकाम करणेकरिता मंजूर झाले आहेत.

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियानांतर्गत १० युपीएचसी व १ युसीएचसी स्थापन करणेबाबत शासनाकडे सन २०१३-१४ मध्ये प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्याअनुषंगाने मा.महासभा ठराव क्र.२८१ अन्वये आरोग्य विषयक अभियान राबविणेबाबत व त्याअंतर्गत १० युपीएचसी व १ युसीएचसी स्थापन करणेस मान्यता दिलेनुसार मा.शासनाने कृती आराखड्यामध्ये मंजुरी दिली असून, मंजूर झालेल्या युपीएचसी व युसीएचसी ची यादी शासनाने निश्चित केलेनुसार तत्कालीन मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने १० युपीएचसी व १ युसीएचसी चा सविस्तर अहवाल (डिझाईन,अंदाजपत्रक जागा मनपा मालकीची कागदपत्रे) शासनाकडे सादर करणेत आला होता. त्यास मा.शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेनुसार ७ आरोग्य केंद्राचे काम पूर्ण होवून नविन इमारतीमध्ये आरोग्य केंद्र सुरु करणेत आले आहेत. उर्वरित दोन आरोग्य केंद्राचे काम प्रगती पथावर आहे व एक आरोग्य केंद्राचे बांधकाम मा.न्यायालयीन आदेशाने स्थगित आहे.

राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियांनातर्गत महानगरपालिका कार्यक्षेत्रामधील झोपडपट्टी व विस्तारीत भागातील नागरिकांना वैद्यकिय सेवा पुरविण्यासाठी व शहरी आरोगय व्यवस्थेचे बळकटीकरण करणेसाठी एक अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर प्रस्तावित करण्यात आलेनुसार एक अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटरकरिता १९१/अ/१+२, वारणाली कुपवाड परिसरातील आरक्षण क्र.३३४ पीएचसी ॲण्ड एमएच क्षेत्रफळ ३१३६ चौ.मी.या जागेवरती नगररचना विभाग,मालमत्ता विभाग, बांधकाम विभाग यांचेकडून स्थळ पहाणी करुन दिलेल्या अभिप्राय व मान्यतेनुसार जागा निश्चित करुन मा.शासनास महानगरपालिका मालकी असलेल्या जागेची कागदपत्रे व नविन बांधकामांचे अंदाजपत्रक मा.महासभा ठराव क्र.२८१ नुसार मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने मा.शासनास प्रस्ताव सादर करणेत आलेनुसार त्यास शासनाने मान्यता देवून निधी मंजूर केला असून, इमारत बांधकामाचे डिझाईन शासन स्तरावर निश्चित करुन पाठविले आहे. त्यानुसार मा.महासभा ठराव क्र.१५१ अन्वये युपीएचसी व युसीएचसी स्तरावरील रुग्ण कल्याण समितीमध्ये स्थानिक नगरसेवक नियुक्ती बाबतच्या ठरावमध्ये नागरी समुह आरोग्य केंद्र,कुपवाडसाठी यापूर्वी शासनाकडे प्रस्तावित करणेत आलेल्या स.नं.१९१/अ/१+२ वारणाली,कुपवाड परिसर पब्लिक हेल्थ मॅटर्निटी होमकरीता आरक्षित असलेल्या जागेस व सन्मा.नगरसेवक निश्चित करणेबाबतचा प्रस्ताव प्रलंबित ठेवणेत आला आहे.

तद्नंतर दरम्यानचे कालावधी मध्ये सन्मा.सदस्यांनी सदर कम्युनिटी हेल्थ सेंटरकरीता कुपवाड येथील स.नं.३०/१/ब आप्पा नाना मगदूम यांचे खाजगी मालकीचे जागा क्षेत्र २६६० चौ.मी. या जागेवरती कम्युनिटी हेल्थ सेंटर उभारणी करणेसाठी वारंवार मागणी केली आहे.त्यानुसार दोन्ही जागेपैकी एक जागा निश्चित करणेकरीता प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करणेत आला आहे. सदर दोन्ही जागांची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे असे....

... २ ...

[illegible] यांचेकडे सादर केलेली १९१/अ/१+२, वारणाली कुपवाड परिसरातील आरक्षण क्र.३३४ [illegible] एम.एच क्षेत्रफळ ३१३६ चौ.मी. या जागेबाबत सहा.संचालक नगररचना यांचे अभिप्रायानुसार ही [illegible] महानगरपालिकेच्या मालकीची असून, ७/१२ उताऱ्यावर महानगरपालिकेचे नाव आहे. सदर जागेस पुर्व व [illegible] कनूस १२ मीटर रुंदीचा रस्ता उपलब्ध आहे. मा.स्थायी समिती ठराव क्र.३७६ दि.२५/१०/२०१८ अन्वये स.नं.१९१/अ १+२ या जागेवर अर्बन कम्युनिटी हेल्थ सेंटर बांधकाम करणेकामी मान्यता दिलेली आहे. तसेच, सदर जागेवर शासनाने बांधकामाचे टाईप डिझाईन मंजूर केले असून, सदरची जागा डिपीमध्ये दवाखान्यासाठी आरक्षित आहे.

तसेच, स.नं.३०/१/ब या जागेबाबत सहा.संचालक नगररचना यांचे अभिप्रायानुसार सदरची जागा विकास योजनेनुसार रहिवासी विभागात समाविष्ठ असली तरी जमिन बिनशेती झालेली कागदपत्रे सादर केलेली नाहीत. या जागेस पोहोच रस्ता दिसून येत नाही. नकाशामध्ये पोहोच रस्ता हा खल्या जागेतून ६ मीटर रुंदीचा ठेवणे आवश्यक आहे. स.नं.३०/१अ/२अ (खुली जागा) सदरची जमिन अर्बन लॅण्ड सिलींग अशी नोंद आहे. याबाबत संबंधीत विभागाचा नाहरकत दाखला घेणे आवश्यक आहे. सदरची जागा खाजगी मालकीची असून, जागेच्या ७/१२ उताऱ्यावर श्री.आप्पा नाना मगदुम यांच्या नावाची नोंद आहे. सदरच्या जागेबाबत अद्याप खरेदीपत्र झाले नसलेचे दिसून येते. सदर मिळकत संपादन करावयाची झाल्यास सन २०१९-२० च्या वार्षिक मुल्य दर तक्त्यानुसार स.नं.३०/१/ब या जागेचा दर १७९०.०० प्रती चौ.मी. दर असून, त्यानुसार सदर जागेचे रेडिरेकनरनुसार मुल्यांकर रु.४७.६१ लाख इतके होत असून, त्या मुल्यांकनानुसार संपादन करणे आवश्यक आहे. तसेच, स.नं.३०/१/ब या जागेवर कम्युनिटी हेल्थ सेंटरच्या मंजूर नकाशाप्रमाणे जागेच्या आकारमानानुसार बांधकाम शक्य नसून, सुधारीत बिल्डींग प्लॅन तयार करुन नगररचना विभागाकडून परवाना व शहर अभियंता यांचेकडून अंदाजपत्रक तयार करुन सुधारीत शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.

उपरोक्त दोन्ही जागांची वस्तुस्थिती, सदर जागेसाठी दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिर निवेदन देवून मागविणेत आलेल्या सूचना/हरकती विचारात घेता तसेच, प्रस्तावित विषयी सभागृहामध्ये सविस्तर झाले चर्चेनुसार ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील वारणाली कुपवाड येथील सि.स.नं.१९१/अ/१+२ ही जागा दवाखान्यासाठी आरक्षीत आहे. परंतु, सदर जमिनीचे वटमुखत्यार श्री.दिपक भगवान यादव यांना र.रु.१९,५०,३३६/- अदा करुन, खरेदीखत करुन घेतले आहे. तथापि, सदर जमिनीचे मुळ मालक श्री.आशिष प्रमोद पाटील यांनी लेखी अर्जान्वये सदर जमिनीचे वटमुखत्यार यांनी चुकीच्या पद्धतीने जमिनीची विक्री केली असून, त्यांना या प्रकरणी कायदेशीर नोटीस दिलेली आहे. तसेच, सदर जमिनीचे पैसे किंवा नुकसान भरपाई आज तागायत मिळाली नसलेचे कळविले आहे.

त्यामुळे श्री.पाटील यांनी आमचे परवानगी शिवाय सदर जागेवर कम्युनिटी हेल्थ सेंटर बांधकाम केल्यास भविष्यात कायदेशिर बाबींना सामोरे जावे लागणार असून, सदर ठिकाणचा प्रस्ताव पूर्णत्वास न जाता, रखडला जावून नागरिकांना मिळणाऱ्या सेवेपासून वंचित रहावे लागणार आहे. तसेच महानगरपालिकेच्या त्या दरम्यानच्या कालावधीच्या वेळेचा अपव्यय होवून, आर्थिक नुकसान मोठ्या प्रमाणात होणार आहे. तसेच, महानगरपालिकेकडून गोरगरिब नागरिकांना दिली जाणारी एक चांगली सेवा रखडल्यामुळे महापालिकेची नाहक बदनामीही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेवून, रि.स.नं.३०/१ब या जागेवर कम्युनिटी हेल्थ सेंटर बांधलेस कुपवाड मधील सर्वच नागरिकांची सोय होणेच्या दृष्टीने उचित होईल असे या सभेचे मत आहे.

सबब, रि.स.नं.१९१/अ/१+२ ही जागा रहिवास क्षेत्रात येत असल्यामुळे पार्किंग व इतरही त्रास भविष्यात नागरिकांना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच, रि.स.नं.३०/१ब ही जागा एम आय डी सी मिरज नजीक असल्यामुळे तसेच गावठाण कुपवाड भागात असून, एम आय डी सी मिरज येथे अनेक उद्योगधंदे असल्यामुळे त्या ठिकाणच्या विस्तारीत लोकसंख्या विचारात घेता, आसपासच्या परिसरातील गोरगरिब नागरिकांना त्याचा मोठ्या प्रमाणात फायदाच होणार आहे. तसेच, त्या परिसरात एकही दवाखाना नसल्यामुळे तेथील नागरिकांची दवाखान्यासाठी मागणी होत असल्यामुळे सदर ठिकाणी कम्युनिटी हेल्थ सेंटर बांधणे योग्य होणार आहे.

सबब, रि.स.नं.३०/१ ब ही मिळकत महानगरपालिकेच्या स.नं.३०/१अ/२अ या मालकीच्या खुल्या जागेलगत असून, त्यालगतच्या पूर्व-पश्चिम ६ मी.रुंद व पुढे ९ मी.रुंद रस्त्यापासून ते कुपवाड मिरज रस्त्यापर्यंत पोहच रस्ता उपलब्ध होत आहे. तथापि,सदर दवाखान्याच्या जागेस १२ मी.रुंदीचा पोहोच मार्ग आवश्यक असलेने, त्यासाठी काही क्षेत्र संपादन करावयाचे झालेस, ते क्षेत्र संपादन करणेस व अनुज्ञेय लाभ आदा करणेस ही सभा मान्यता देत असून, स.नं.३०/१ ब क्षेत्र २६६०.०० चौ.मी. च्या मिळकतीचा आगाऊ कब्जा मिळकतधारक श्री.आप्पा नाना मगदूम यांनी महापालिकेस र.रु.१०० च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्राच्या आधारे दिला असून, सदर मिळकतीच्या नुकसान भरपाई पोटी टि.डी.आर.अथवा मोबदला स्वरुपात स्विकारणेची तयारी दर्शविली आहे. परंतु, प्रचलित बांधकाम विकास नियंत्रण नियमावलीनुसार सदर रहिवास भागातील मिळकत असलेने टि.डी.आर.अनुज्ञेय नाही. तथापि, सदर मिळकत संपादन करावयाची झालेस सन २०१९-२० च्या वार्षिक मुल्यदर तक्त्यानुसार होणाऱ्या मुल्यांकनानुसार संपादन / खरेदी करणे आवश्यक असलेबाबतचा अभिप्राय प्र.सहा.संचालक नगररचना यांनी दिलेनुसार सदर जागेचे सन १९-२० च्या वार्षिक मुल्यदर तक्त्यानुसार होणाऱ्या मुल्यांकनानुसार मुल्यांकन र.रु.४७,६१,४००/-इतके होत आहे. मुळ मालक यांनी सदरची जागा अकृषीक करुन महानगरपालिकेच्या ताब्यात देणे आवश्यक आहे. त्यानुसार रि.स.नं.३०/१ ब ही जागा महानगरपालिकेच्या शर्ती-अटीनुसार व जमीन मालक यांनी तयारी दर्शविल्यानुसार र.रु.४७,६१, ४००/- मोबदला देवून, खरेदी करणेस तसेच, स.नं.३०/१/ब, क्षेत्र २६६० चौ.मी. या जागेवर कम्युनिटी हेल्थ सेंटरच्या मंजूर नकाशाप्रमाणे जागेच्या आकारमानानुसार सुधारीत बिल्डींग प्लॅन तयार करुन नगररचना विभागाकडून बांधकाम परवाना व शहर अभियंता यांचेकडून सुधारित अंदाजपत्रक तयार करुन घेवून, मा.शासनाच्या मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच, रि.स.नं.१९१/अ/१+२ ही जागा दवाखान्यासाठी आरक्षित असल्यामुळे सदर ठिकाणी नगारिकांची गैरसोय टाळणेच्या दृष्टीने एक युपीएचसी स्थापन करणेसाठी नविन प्रस्ताव तयार करुन, त्यानुसार दोन्ही प्रस्तावाचे कामी योग्यती कार्यवाही प्रशासनाने सत्वर ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे. ठरावाच्या बाजूने ५९ सदस्य व विरोधक म्हणून १६ सदस्य असा बहूमताने ठराव मंजूरीस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- **मा.युवराज सतीश बावडेकर**

बहुमताने मंजुर

अनुमोदक :- **मा.गजानन रामू मगदूम**

मा.संगिता विठ्ठलराव खोत
महापौर,

प्रस्तुत-चा ठराव मा. आयुक्तसो यांचे निदर्शनास आणून पुढील कार्यवाही होणेत यावी.

वैद्य आरोग्याधिकारी

मा.महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ९६

विषय क्रमांक :- १०

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१/०८/२०१९ रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये महिलांसाठी सर्वाधिक गर्दीच्या चार ठिकाणी पिंक टॉयलेट सुरु करणेसाठी महापालिका क्षेत्रातील चार ठिकाणे निश्चित करणेस मान्यता देणेकामी आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार प्रभाग समिती मार्फत प्रत्येकी एक गर्दीच्या ठिकाणची जागा सुचविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (वाजिदा मार्ग) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (रवीन्द्र बाबर) महापौर,

वैद्यकीय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ९७

विषय क्रमांक :- ११

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.०१/०८/२०१९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील सि.स.नं.२३,२५ व ३० या मनपा मालकीच्या जागेतील फिश /मटण मार्केट इमारतीची पुन:बांधणी करणे करीता महापालिका वास्तुविशारद पॅनल वरील वास्तुविशारद श्री.आशिष चिंचवाडे,सांगली यांचेकडून प्राप्त झालेला र.रु.४,७४,५०,२६३/- मात्रचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या राष्ट्रीय मत्स्य विकास महामंडळाकडे निधी मंजुरीसाठी पाठविणेस मान्यता देणेकामी उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे विषयपत्र अवलोकनी घेऊन ही सभा पुढीलप्रमाणे आदेशीत करीत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सि.स.नं.२३,२५ व ३० ही जागा मनपाच्या मालकीची असून त्या जागेवर सद्या चालू स्थितीतील ५० वर्षापूर्वी बांधणेत आलेली फिश / मटण मार्केट इमारत आहे. ती इमारत फार जुनी झालेली आहे, इमारत पूर्णपणे जीर्ण व पडलेल्या अवस्थेत आहे. म्हणून सन्मा. सदस्या सौ. स्वाती नितीन शिंदे यांनी सदरचे फिश / मटण मार्केट पाडून त्याठिकाणी नवीन अद्यावत व सुसज्ज अशी मार्केट इमारत उभी करावी असा विषय महासभेपुढे आणला. सदर इमारतीचे क्षेत्र ३२१६ चौ.मी. आहे. सदर इमारतीस अंदाजपत्रकानुसार येणारी र.रु.४,७४,५०,२६३/- मात्रचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या राष्ट्रीय मत्स्य विकास महामंडळाकडे निधी मंजुरीसाठी पाठविणेस व शासन धोरणाप्रमाणे मनपा स्वहिस्सा भरणेबाबत मान्यतेस्तव शासनाकडे पाठवावा त्याप्रमाणे विषयपत्रातील विषयाप्रमाणे शासन निधी ९०% व मनपा हिस्सा १०% अनुदान प्राप्त ग्राह्य आहे असे सुचित केले आहे. त्याप्रमाणे स्थायी समिती ठराव क्र.४०७, दि.१४/१२/२०१८ व सुधारीत ठराव क्र.४११, दि.३१/१२/२०१८ अन्वये मान्यता मिळालेल्या मनपा वास्तुविशारद पॅनल वरील वास्तुविशारद श्री. आशिष चिंचवाडे, सांगली यांचेकडून प्राप्त झालेला फिश मार्केट उभारणी प्रस्ताव केंद्र शासनाच्या राष्ट्रीय मत्स्य विकास महामंडळाकडे मंजूरीस्तव पाठविणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. युवराज सतिश बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. धीरज चंद्रकांत सुर्यवंशी

मा. संगिता विठ्ठलराव खोत
महापौर,

उप महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ९८

विषय क्रमांक :- १२

सोबतचे उपायुक्त (बांधकाम (उद्याने) विभाग) यांचे दि.१/०८/२०१९ रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

IMA वर्किंग कमिटी व सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांचे संयुक्त विद्यमाने आमराई उद्यानातील फुलपाखरु उद्यान विकासीत करणे व उद्यानाची दैंनदिन देखभाल व्यवस्था ठेवणेस निर्णयार्थ आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (वाणेरा माळी) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (स्वप्नील कांबळे) महापौर,

शहर अभियंता बांधकाम (उद्यान विभाग)

उपायुक्त

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- ९९

विषय क्रमांक :- १३

सोबतचे उपायुक्त (दिव्यांग कक्ष) यांचे दि.३१/०७/२०१९ रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका आणि आकार फाऊंडेशन,सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने महानगरपालिका शाळा क्र.६ मधील ३ वर्ग खोल्यांमध्ये मानसिक आजार आधार केंद्र चालविणेस धोरणात्मक निर्णयार्थ आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार व विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (गणेश मार्ने) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (रुक्मण नवर्ने) महापौर,

उपायुक्त (दिव्यांग कक्ष)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- १००

विषय क्रमांक :- १४

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.३१/०७/२०१९ रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

रोटरी क्लब ऑफ इचलकरंजी टेक्सटाईल सिटी यांनी मिरज हायस्कूल, मिरजचे नुतनीकरण करणेसाठी र.रु.८०.०० लक्ष मात्रचे कामी नुतनीकरण करणेकरीता परवानगी देणे व समजुतीचा लेख (MOU) चा मसुदा मान्य करुन, त्यांच्याशी समजुतीचा लेख करणेसाठी धोरणात्मक निर्णयास्तव आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (गणेश सार्वे)

अनुमोदक :- (लक्ष्मण नवलाई)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

(शहर अभियंता (सांगली))

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- १०१

विषय क्रमांक :- १५

सोबतचे उपायुक्त (बांधकाम (विद्युत) विभाग) यांचे दि.३१/०७/२०१९ रोजीचे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

स्ट्रीट लाईटींग नॅशनल प्लॅन (SLNP) अंतर्गत इस्को (ESCO) मोडमध्ये एनर्जी एफिशिअन्सी सर्व्हिसेस लि.(EESL) यांचेमार्फत महानगरपालिका स्थलसिमेमध्ये एलईडी प्रकल्प राबविणेस निर्णयार्थ आलेल्या प्रस्तावास सभागृहामध्ये झालेल्या चर्चेनुसार सन्मा. सदस्यांच्या आलेल्या हरकती व सुचनांचा समावेश करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- **मा. युवराज सतिश बावडेकर** **ठराव सर्वानुमते मंजुर**

अनुमोदक :- **मा.धीरज चंद्रकांत सुर्यवंशी** **मा. संगिता विठ्ठलराव खोत**

महापौर,

शहर अभियंता (विद्युत)

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- १९/०९/२०१९

ठराव क्रमांक :- 902

विषय क्रमांक :- १६

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.०७/०९/२०१९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये घनकचरा व्यवस्थापन संदर्भात मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पुणे यांनी दि.२९/१२/२०१६ ला दिले निर्देशान्वये महापालिकेने सल्लागारांच्या मार्फत तयार केलेला व मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, पूणे यांनी नियुक्त केलेल्या तज्ञ सल्लागार व महराष्ट्र प्रदुषण मंडळ तसेच सांगली जिल्हा सुधार समिती यांनी सहमती दर्शविल्याप्रमाणे सविस्तर घनकचरा प्रकल्पाची अंमलबजावणी महापालिकेने करावी व सदर प्रकल्प डिसेंबर २०१७ पर्यत प्राधान्याने कार्यान्वयीत करावा तसेच मार्च २०१८ पुर्वी सदरचा प्रकल्प कार्यान्वयीत झालाच पाहिजे असे निर्देशीत केले होते.

उक्त प्रकल्पाबाबत दि.२९/०८/२०१९ रोजी महापालिकेच्या घनकचरा प्रकल्पाबाबत राज्यस्तरीय तांत्रिक समिती (एस.एल.टी.सी.) मंत्रालय मुंबई येथील बैठकी मधील प्राथमिक चर्चेनुसार शहराच्या लोकसंख्येनुसार दरडोई र.रु.१२००/- प्रमाणे ६०.०५ कोटी रक्कमेपर्यत प्राथमिक डी.पी.आर.करणेबाबत दिले सुचनेनुसार मा.स्थायी समिती ठराव क्र.७९ दि.०६/०८/२०१९ — २०/०८/२०१९ नुसार एस.पी.कॅपीटल ॲडव्हॉयझर लि.मुंबईचे मक्तेदार योगेंद्र नाईक यांना डी.पी.आर. तयार करणे व त्यास तांत्रिक मान्यता घेणेबाबत दिले मंजुरीनुसार विषयपत्रातील डी.पी.आर. मधील घटक क्र.१ व २ नुसार ६ ०.०५ कोटी इतक्या रक्कमेचा नमुद केलेला तपशिल व शासन अनुदानाबाबत नमुद केलेला तपशिल इ.संपूर्ण अहवाल नमुद केला आहे.

घनकचरा व्यवस्थापनासाठी ही सभा-

१. मा.शासनाच्या निर्देशाप्रमाणे वेळोवेळी प्रकल्प अहवाल (डी.पी.आर) मा.शासनास सादर करण्यास मान्यता देत आहे.
२. प्रकल्प अहवालाच्या (डी.पी.आर.) तांत्रिक मान्यतेस येणाऱ्या खर्चास मंजुरी देण्यास मान्यता देत आहे.
३. प्रकल्प अहवालामध्ये (डी.पी.आर.) भविष्यात काही बदल करणेच्या सूचना प्राप्त झाल्यास याबाबतचे अधिकार महानगरपालिका आयुक्तास येणाऱ्या आगामी महासभेपर्यंत देण्यास मान्यता देत आहे.

वरील मान्यतेस अधिन राहून नुकत्याच लागलेल्या आचारसंहितेचा कालावधी विचारात घेता व न्यायालयीन निर्देशाचे लवकर पालन होणेच्या दृष्टीने तांत्रिक मंजुरी घेवून, मा.शासनास प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. श्री. कुपवाड शहरिश्री चौधरी

ठराव सर्वानुमते मंजुर

उपायुक्त (आरोग्य विभाग)
मुख्य प्रशासकीय अधिकारी
मुख्य महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

अनुमोदक :- मा. श्री. धनराज पंढरीनाथ पुजारी

महापौर,